# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ५०४/२०२२

**तक्रारकर्ता,** श्रीमती तृप्ती जयहिंद पाटील,
मु.पो.विनायक (डोंगरआळी), केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव, ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २/४/२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/१/२०२२ | ---- | ३/३/२०२२ | २८/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.५/७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २/४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती खालापूर अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" विनायक काठेआळी, गणपती चौक मांडळखलाटी शेतीकडे पावसाळी पाणी जाण्याच्या नाल्यात इमारतीचे व तेथील घरांचे सांडपाणी सोडण्याबाबत सरपंच/ग्रामविकास अधिकारी ग्रा.पं.केगांव यांजकडील पत्र क्र.३३६ दि.२३/१०/२०२०. १) उपरोक्त विषयान्वये २० ते २५ वर्षापासून वास्तव्य करीत असणाऱ्यांची यादी मिळावी. २) आपल्या म्हणण्यानुसार ज्यांनी आपल्या आवारात शोषखड्डा खोदून व परसबागा तयार करुन सांडपाणी सोडले आहे त्यांची माहिती मिळावी. ३) ज्यांच्याकडे जागा उपलब्ध नाही अशा कुटूंबाची माहिती मिळावी. ४) वरील सर्वांना ग्रा.प.अधिनियमानुसार घर बांधणेस परवानगी दिल्याच्या प्रती मिळाव्यात. ५) घर नंबर देतेवेळी ग्रा.पं.अधिनियमाची संबंधित घरमालकांनी पूर्तता केल्याची पडताळणी ग्रा.पं.ने केली असल्यास त्याच्या प्रती मिळाव्यात. ६) वरीलपैकी सांडपाणी नाल्यात सोडण्यास आजपर्यंत ज्यांना नोटीस दिल्यात त्याची प्रत व त्या नोटीसला सदर लोकांनी दिलेल्या उत्तराच्या प्रती मिळाव्या. ७) नोटीस देऊनही सांडपाणी नाल्यात सोडण्यास प्रतिबंध न करणाऱ्यांवर केलेल्या कायदेशीर कारवाईच्या प्रती सही शिक्यानिशी सत्यप्रत करून मिळाव्यात."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/३/२०२२ रोजी, *"जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील ग्रामविकास अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखेपासुन आजच अपीलकार यांना माहिती पुरवावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांनी ज्या पत्राच्या अनुषंगाने माहितीची मागणी केलेली आहे ते पत्र त्यांचे कार्यालयात आढळून येत नाही. वास्तविक तक्रारकर्ता यांनी ज्या पत्राचा संदर्भ दिला आहे ते पत्र ग्रामपंचायत केगाव यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती उरण यांना लिहीलेले आहे. त्यामुळे ते त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाही हा युक्तिवाद मान्य करता येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन माहिती ३० दिवसात समक्ष नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना ३० दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४/१/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१२/५/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ एप्रिल २०२६ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव **– यांना प्रत**

-- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२. **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)